
# अमर हिंद मंडळ, दादर

## स्थापना : २६ जानेवारी १९४७

सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई) संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५-६-१९४९



## ७०

# वार्षिक अहवाल

## २०१६ - २०१७

अमरवाडी, गोखले पथ (उत्तर), दादर, मुंबई-४०० ०२८. दूरध्वनी : २४२२ ३५ ८९, २४२१ ९० ११

# अमर हिंद मंडळ, दादर

## विश्वस्त मंडळ आणि कार्यकारी समिती



**दिनकर शंकर पाटील**
विश्वस्त



**उषा शशिकांत मेहता**
विश्वस्त



**रमेश माधवराव वरळीकर**
विश्वस्त



**भास्कर जयराम सावंत**
अध्यक्ष



**चिंतामणी विश्वनाथ नागले**
उपाध्यक्ष



**उर्मिला उमेश शेणॉय**
उपाध्यक्ष



**दीपक नारायण पडते**
कार्याध्यक्ष



**अरुण अनंत देशपांडे**
कार्योपाध्यक्ष



**श्रीकृष्ण शंकर राणे**
कार्यवाह



**प्रफुल्ल दामोदर पाटील**
संयुक्त कार्यवाह



**सतीश शरश्चंद्र रेडीज**
कोषाध्यक्ष



**दत्ता अनंत सावंत**
कार्यकारी सदस्य



**सीमा चंद्रशेखर कोल्हटकर**
कार्यकारी सदस्य



**संजय विठ्ठल पेडणेकर**
कार्यकारी सदस्य



**विजय प्रताप राणे**
कार्यकारी सदस्य



**दीपक नारायण नाडकर्णी**
कार्यकारी सदस्य



**विलास प्रभाकर कारेकर**
कार्यकारी सदस्य



**रविंद्र ढवळे**
कार्यकारी सदस्य



**रमेश नाटेकर**
कार्यकारी सदस्य




**जतीन टाकळे**
कार्यकारी सदस्य




**वर्षा राजे**
कार्यकारी सदस्य

## १५ ऑगस्ट २०१६ कार्यक्रमाची क्षणचित्रे










## ज्येष्ठ तहहयात सभासद सत्कार (७५ वर्षा वरील)









## ''चाहुल उद्याची'' महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा क्षणचित्रे









## २६ जानेवारी २०१७ कार्यक्रमाची क्षणचित्रे






















## अमर हिंद मंडळास कोरियाचा कबड्डी संघाच्या सदस्यांची सदिच्छा भेट.
















# अमर हिंद मंडळ, दादर

## मुंबई – ४०० ०२८.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २९/१०/२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष श्री. भास्कर सावंत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

सभेपुढील कामे :–

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. सन २०१६–२०१७ सालचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.

३. सन २०१६–२०१७ सालचा हिशेब व ताळेबंद मंजूर करणे.

४. सन २०१७–२०१८ साठी हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.

५. सन २०१७–२०१८ चे अंदाजपत्रक मंजूर करणे. (Annexure - B)

६. निधीत रक्कम वर्ग करण्याबाबत ठराव मंजूर करणे.

७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांवर विचार करणे.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने

दिनांक : २८/०९/२०१७

श्रीकृष्ण राणे
कार्यवाह

**सूचना :**

१) गणपूर्तीचे अभावी नियोजितवेळी सभा सुरु न करता सभा स्थगित करण्यात येईल, ही स्थगित सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी १०.३० वा. भरेल व ही सभा पूर्णपणे वैध असेल.

२) सभासदांना अहवाल, हिशेब, अंदाजपत्रक, संस्थेच्या कामकाजासंबंधी सभेत प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी मंडळाच्या कार्यालयात लेखी स्वरुपात सोमवार, दि. २३ ऑक्टोबर २०१७ पर्यंत सायं. ६ ते ८ या वेळेत (रविवार व्यतिरिक्त) सादर करावेत.

३) सभासदांनी आपले बदललेले पत्ते त्वरीत कळवावेत तसेच हयात नसलेल्या सभासदांच्या संबंधितांनी तत्सबंधीची माहिती कार्यालयात कळविण्याची कृपा करावी.

४) सर्वसाधारण सभेसाठी येताना कृपया हा अहवाल सोबत घेऊन यावा.

# वार्षिक अहवाल
## (१ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७)

सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,

नमस्कार,

मंडळाचा ७० वा वार्षिक अहवाल जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणास सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

दि. २६ जानेवारी २०१७ रोजी मंडळाच्या स्थापनेला ७० वर्ष पूर्ण झाली. या प्रजासत्ताकदिनी कार्यकारी सदस्य श्री. दिपक नाडकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. नंतर मंडळाच्या वर्धापनदिनानिमित्त मंडळाचे तहहयात सभासद, खेळाडू व कलाकार यांनी विविध करमणुकीचे कार्यक्रम सादर करुन कार्यक्रम यशस्वी केला.

अहवाल काळात मंडळाने आंतरशालेय कबड्डी, खोखो, लंगडी या खेळांच्या स्पर्धा, राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा, राज्यस्तरीय मराठी एकांकिका लेखन स्पर्धा, आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, राज्यस्तरीय नाट्य गायन स्पर्धा अशा सर्व स्पर्धांचे आयोजन मंडळाने यशस्वीपणे केले.

मंडळ आयोजित करीत असलेल्या कला, क्रीडा, समाजकल्याण, शैक्षणिक, वैद्यकीय कार्यक्रम, स्पर्धा यांमध्ये अहवाल काळात सातत्य राखण्यात आले. इमारत डागडुजी अंतर्गत करण्याची कामे चालू करण्यात येऊन त्यांची पूर्तता झाली आहे. बाकी राहिलेली इतर कामे उदा. समोरच्या भिंतींची डागडूजी, पोटमाळा, हॉल ए. सी. करणे, हॉलमध्ये नवीन टाईल्स बसवणे, पूर्ण बिल्डींगला रंग काढणे, नवीन नावाचा बोर्ड बसवणे, व्यायाम शाळा अद्ययावत करणे इ. कामे आगामी काळात करण्याचे योजिले आहे. तसेच आगामी काळात काही नवीन उपक्रम सुरु करण्याचे ठरविले आहे.

### मंडळाचा वार्षिक अहवाल पुढील प्रमाणे :-

**सभा :-** अहवाल कालावधीत कार्यकारी समितीच्या ११ सभा झाल्या आणि विश्वस्त, अध्यक्ष, उपाध्यक्ष व कार्यकारी समिती यांच्या संयुक्त सभा ३ झाल्या (संयुक्त सभा आणि कार्यकारी समिती सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट 'अ' पहावे.)

**मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा :-** मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि.२५ सप्टेंबर २०१६ रोजी संपन्न झाली. या सभेस एकूण ७१ तहहयात सभासद उपस्थित होते.

**विगतवारी निधी :-** अहवाल काळात वैद्यकीय निधीत ३,२०,०००/-, शैक्षणिक निधीत ३,२०,०००/-, समाज कल्याण निधी १,३०,०००/-, कला विभाग १,२०,०००/-, क्रीडा विभाग १,५०,०००/-, वसंत व्याख्यानमाला २०,०००/- एकूण १०,६०,०००/- (रुपये दहा लाख साठ हजार रुपये फक्त ) वर्ग करण्यात आले.

**कॅटरिंग व्यवस्था :-** १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीसाठी "न्यु मयुर कॅटरर्स अॅण्ड डेकोरेटर्स" यांना संपूर्ण कॅटरिंग, डेकोरेशन व्यवस्थेसाठी ठेकेदारी देण्यात आली.

# -: उपक्रम आणि कार्यक्रम :-

| अ. क्र. | दिनांक | कार्यक्रम/ उपक्रमांचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| १ | **६९ वी वसंत व्याख्यानमाला** | | |
| | रविवार दि. १७ एप्रिल २०१६ | 'रंग तरंग' | मा. श्रीमती नीला सत्यनारायण यांची मुलाखत मुलाखतकार - ॲड. निलिमा कानेटकर |
| | सोमवार दि. १८ एप्रिल २०१६ | आर्य चाणक्य | डॉ. गिरीश दाबके - पत्रकार, लेखक |
| | मंगळवार, दि. १९ एप्रिल २०१६ | जागतिक अर्थव्यवस्था आणि भारत | डॉ. अभिजीत फडणीस, अर्थशास्त्राचे अभ्यासक |
| | बुधवार, दि. २० एप्रिल २०१६ | गुरुत्वीय लहरी | डॉ. बाळ फोंडके, सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ |
| | गुरुवार, दि. २१ एप्रिल २०१६ | 'मी..... सुरेश खरे' | नाटककार सुरेश खरे यांची मुलाखत मुलाखतकार - मधुवंती सप्रे |
| | शुक्रवार, दि. २२ एप्रिल २०१६ | गिर्यारोहण आणि गिरीभ्रमण काल आणि आज | श्री. वसंत वसंत लिमये प्रसिद्ध गिर्यारोहक व लेखक मुलाखतकार - सिमा कोल्हटकर |
| | शनिवार दि. २३ एप्रिल २०१६ | शोध नव्या भारताचा | डॉ. उदय निरगुडकर रोखठोक, पत्रकार |
| | रविवार दि. २४ एप्रिल २०१६ | साहित्यातील बहुसांस्कृतिकता | श्री. श्रीपाल सबनीस, प्रसिद्ध साहित्यिक, अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष |
| २ | गुरुवार १४ एप्रिल ते शनिवार, ३० एप्रिल २०१६ | बालनाट्य प्रशिक्षण शिबीर ३५ शिबीरार्थींचा समावेश | संचालिका : लीला हडप मार्गदर्शक : दत्ता सावंत प्रमुख पाहुणे : संजय क्षेमकल्याणी |
| ३ | रविवार, १ मे २०१६ | स्नेहमेळावा | तहह्यात सभासद, खेळाडू, कलाकार, हितचिंतक, कार्यकर्ते यांच्यासाठी सोनल प्रॉडक्शन निर्मित : **'डोन्ट वरी बी हॅपी'** या नाटकाचा प्रयोग |
| ४ | शुक्रवार, २७ मे २०१६ ते २९ मे २०१६ | टिम स्पिरीट वर्कशॉप | मंडळाचे विश्वस्त, कार्यकारी समिती, ऋतुराज रिसॉर्ट, बोर्डी |
| ५ | सोमवार, १५ ऑगस्ट २०१६ | स्वातंत्र्यदिन, विद्यार्थी गुणगौरव | ध्वजारोहण प्रमुख पाहुणे : श्री. श्रीकृष्ण राणे, कार्यवाह व ज्येष्ठ तहहयात सभासदांचा सत्कार, खेळाडू, कलाकार गुणगौरव |
| ६ | शनिवार, रविवार १/२ ऑक्टोबर २०१६ प्राथमिक फेरी | अमर हिंद मंडळ राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा | परीक्षक श्री. नारायण जाधव श्रीमती प्रतिभा पाटील |

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमांचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| ७ | शनिवार, ८ ऑक्टोबर २०१६ अंतिम फेरी | अमर हिंद मंडळ राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा | परीक्षक : श्रीमती मृणाल चेंबुरकर श्री. रवींद्र पांचाळ, श्री. अनिल गवस |
| ८ | शनिवार, ८ ऑक्टोबर २०१६ | राज्यस्तरीय मराठी एकांकिका लेखन स्पर्धा | परीक्षक : श्री. सुरेश शिंदे श्री. सुभाष तोडणकर |
| ९ | शनिवार, १७ डिसेंबर २०१६ | अमर हिंद मंडळ व मिती क्रिएशन संयुक्त कार्यक्रम | सामाजिक कार्य करणाऱ्या अपंग व्यक्तींचा व संस्थांचा गौरव |
| १० | मंगळवार, ३ जानेवारी ते ६ जानेवारी २०१७ | शालेय स्पर्धा खो खो / लंगडी, कबड्डी | प्रमुख पाहुणे : लंगडी – श्रीमती सुचिता शेट्टी, मुख्याध्यापक शारदाश्रम विद्या मंदिर खो खो – श्री. मंगेश वरवडेकर, कबड्डी – श्री. शशिकांत राऊत |
| ११ | शनिवार, ७ जानेवारी ते ११ जानेवारी २०१७ | मुली जिल्हा अजिंक्यपद खो खो स्पर्धा पुरुष गट जोड जिल्हा खो खो स्पर्धा | प्रमुख पाहुणे : श्री. रमेश वरळीकर, मंडळाचे विश्वस्त यांच्या हस्ते बक्षिस समारंभ |
| १२ | रविवार, दि.१५ जाने. ते १९ जाने. २०१७ | जिल्हास्तरीय कुमार गट व महिला गट कबड्डी स्पर्धा | प्रमुख पाहुणे : विजया शेलार–राणे |
| १३ | गुरुवार, २६ जानेवारी २०१७ | प्रजासत्ताक दिन / वर्धापन दिन | ध्वजारोहण प्रमुख पाहुणे : दिपक नाडकर्णी कार्यकारी समिती सदस्य, कलाकार, खेळाडूंचा सांस्कृतिक कार्यक्रम |
| १४ | मंगळवार, ०७ फेब्रुवारी २०१७ | राज्यस्तरीय नाटयगीत गायन स्पर्धा | परीक्षक : श्री साई बँकर, श्रीमती नुपूर गाडगीळ प्रमुख पाहुणे : श्री. रामदास कामत प्रथम – संपदा माने, द्वितीय – दुहिता कुणकवळेकर तृतीय – कल्याणी शेटये उत्तेजनार्थ : ओंकार देगळूरकर, शर्वरी गोखले |
| १५ | शनिवार, ११/१२ फेब्रुवारी २०१७ | विचार मंथन शिबिर खंडाळा | मंडळाचे विश्वस्त, कार्यकारी समिती, पदाधिकारी आणि सदस्य यांचे चर्चासत्र |
| १६ | रविवार, २६ मार्च २०१७ | अमर हिंद मंडळ राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा | परीक्षक : श्री. विजय तापस, श्रीमती अंजना कर्णिक, श्री. सुनिल घुमे प्रथम : चित्ततोष खांडेकर द्वितीय : सुजित काळगे तृतीय : शंतनु रिठे उत्तेजनार्थ : हर्षद आवटे आदित्य कुळकर्णी अंतिम फेरीत सहभाग : संकेत ठेके, स्वानंद गांगण, सोनिया मिश्रा, भरत रिडलॉज, सौरभ शेवाळे, श्वेता आमरे |

# क्रीडा विभाग

## खो-खो

- **इन्स्पायर खो-खो आयोजित कुमार/कुमारी निमंत्रित जिल्हा स्तरीय खो-खो स्पर्धा १६-१७**
  दि. ४ ते ५ जून २०१६ रोजी ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर येथे स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत आपल्या मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. कुमार संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. मुलींच्या संघामधील कु. संजना कुडव हिला उत्कृष्ट सरंक्षकाचे पारितोषिक देण्यात आले.

- **कुमार/कुमारी मुंबई जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा १६-१७**
  दि. ७ ते ११ जानेवारी २०१७ रोजी अमर हिंद मंडळ, दादर येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत आपल्या मुलींच्या संघाने उपविजेतेपद संपादन केले. कुमारांच्या संघाने सुद्धा उपविजेतेपद प्राप्त केले. सदर स्पर्धेत कु. मधुरा पेडणेकर हिला सर्वोत्कृष्ट सरंक्षकाचे पारितोषिक देण्यात आले. मुलांच्या संघामध्ये कु. प्रसाद भाटकर यांस हा सर्वोत्कृष्ट सरंक्षकाचे पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेतून मुंबई मुलींच्या संघामध्ये कु. मधुरा पेडणेकर, संजना कुडव व तन्वी उपळकर यांची, तर कु. प्रसाद भाटकर व कु. तरुण मेस्त्री यांची निवड मुलांच्या संघात करण्यात आली.

- **पुरुष/महिला मुंबई जिल्हा अजिंक्यपद व निवडचाचणी खो-खो स्पर्धा १६-१७**
  दि. ३ ते ५ मार्च २०१७ रोजी शिवशंकर उत्सव, लोअर परळ येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत महिला संघाने तृतीय स्थान प्राप्त केले. मुंबई जिल्हा संघात पुरुष संघात कु. आदेश कागडा व महिला संघात कु. मधुरा पेडणेकर, कु. संजना कुडव, कु. प्राची सुर्वे यांची निवड करण्यात आली.

- किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद व निवडचाचणी स्पर्धा, चिंचणी, पालघर येथे दि. २ ते ५ फेब्रुवारी २०१७ झालेल्या स्पर्धेत कु. देविशा म्हात्रे हिची निवड करण्यात आली होती.

- मुंबई जिल्हा कुमार/कुमारी संघ निवडण्यासाठी श्री. जतिन टाकळे यांची निवड करण्यात आली होती.

- मुंबई जिल्हा संघटनेच्या समितीमध्ये उपाध्यक्षपदी श्री. अरुण देशपांडे व सहकार्यवाह म्हणून श्री. जतिन टाकळे तसेच जेष्ठ सदस्य म्हणून श्री. प्रफुल्ल पाटील यांची बिनविरोध निवड झाली.

- कु. आदेश कागडा याची आंतर विद्यापीठ अखिल भारतीय महाविद्यालयीन खो- खो स्पर्धेत मुंबई विद्यापिठातून निवड करण्यात आली. सदर स्पर्धा २ ते ५ फेब्रुवारी २०१७ रोजी वेस्ट बंगाल येथे पार पडली.

- कु. आदेश कागडा याची महाराष्ट्र राज्य इंटर युनिव्हर्सिटी क्रीडा महोत्सव २०१६ (अश्वमेघ) स्पर्धेत मुंबई विद्यापीठातून निवड करण्यात आली. सदर स्पर्धा २७ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०१६ रोजी परभणी येथे पार पडली.

- कु. मधुरा पेडणेकर हिला कै. मनोहर विचारे प्रतिष्ठान यांचा गौरव पुरस्कार - २०१७ राष्ट्रीय महिला खो-खो पटू म्हणून गौरविण्यात आले.
- कु. मधुरा पेडणेकर हिची महिला राष्ट्रीय स्पर्धेत निवड करण्यात आली. सदर स्पर्धा नागपूर येथे २३ ऑक्टोबर २०१६ ला पार पडली.
- कु. मधुरा पेडणेकर हिची मुली राष्ट्रीय स्पर्धेत निवड करण्यात आली. सदर स्पर्धा अझमगढ, युपी येथे १५ नोव्हेंबर २०१६ ला पार पडली.
- कु. मधुरा पेडणेकर हिची कुमार/मुली ज्युनियर वेस्ट झोन राष्ट्रीय स्पर्धेत निवड करण्यात आली सदरस्पर्धा गुजरात येथे पार पडली.
- कु. मधुरा पेडणेकर हिची महाराष्ट्र राज्य इंटर युनिव्हरसिटी क्रीडा महोत्सव २०१६ (अश्वमेघ) या स्पर्धेत निवड करण्यात आली सदर स्पर्धा २७ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०१६ रोजी परभणी येथे पार पडली.

मंडळातील खो खो चा सराव **जतिन टाकळे, निलेश सावंत, रोहन चव्हाण, निकेश धुरी व अमित संत** घेत असतात.

## -: कबड्डी (महिला) :-

**साल २०१६-१७ हंगामातील महिला कबड्डी संघाची उल्लेखनीय कामगिरी**

**जिल्हा स्तरीय स्पर्धा**

१) शिवनेरी सेवा मंडळ (विजेते पद) २)दुर्गा माता सेवा मंडळ (उपविजयी)

३) ज्ञानप्रकाश सेवा मंडळ (विजेते पद) ४)आर्य समाज (विजेते पद)

५) राष्ट्रीय मिल मजदूर संघ (विजेते पद)

उपरोक्त स्पर्धांमधून पुढील खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाडूचे पारितोषिक मिळविले.

**१) दीप्ती पारकर २) तेजस्विनी पोटे ३) श्रद्धा कदम ४) प्राजक्ता कांबळी ५) तेजश्री सारंग**

**मुंबई शहर किशोरी गट संघात निवड**

**१) कु. अवंतिका गोटे २) कु. पेलसिका नाडर**

**मुंबई शहर कुमारी गट संघात निवड**

**१) कु. तेजश्री सारंग २) कु. दिव्या रेडकर**

मुंबई शहर महिला संघात निवड : **कु. तेजस्विनी पोटे**

बीड जिल्हा विद्यापीठ संघात **कु. प्राजक्ता कांबळीची निवड**

**कु. तेजश्री सारंग** हिची मुंबई शहर संघाची कर्णधार म्हणून निवड व त्याच प्रमाणे महाराष्ट्र राज्य कुमारी गट फेडरेशन संघाचे कर्णधार पद व संभाव्य भारतीय महिला संघात निवड.

विविध स्थानिक व राज्य स्तरीय सामन्यातून पुढील खेळाडूंची उल्लेखनीय कामगिरी : **दिव्या रेडकर, दिव्या यादव, नम्रता कुंभार,** दैनंदिन सराव **कु. दीप्ती पारकर, प्रियांका कोठेकर व तेजस्विनी पोटे.**

## कबड्डी (कुमार / पुरुष)

**साल २०१६-१७ हंगामातील खेळाडूंची उल्लेखनीय कामगिरी**

**कुमार गट स्पर्धा (जिल्हा स्तरीय)**

१) मुंबई शहर अजिंक्यपद (विजेते पद)
२) वंदे मातरम् सेवा मंडळ (विजेते पद)
३) कासारवाडी वेल्फेअर सेंटर (विजेते पद)
४) युवा कबड्डी संघ (विजेते पद)
५) ॐ ज्ञानदिप क्रीडा मंडळ (उपविजयी)

उपरोक्त स्पर्धा मधून **अनिकेत पेवेकर, ओमकार पोफळणकर, अक्षय कारकर** ह्या खेळाडूस उत्कृष्ट कामगिरीचे पारितोषिक मिळाले.

**कु. अनिकेत पेवेकर** ह्यास मुंबई जिल्हा (कुमार गट) कर्णधार पद मिळाले, त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य (कुमार गट) संघात त्याची निवड झाली.

विविध स्थानिक तसेच राज्यस्तरीय सामन्यातून पुढील खेळाडूंनी उल्लेखनिय कामगिरी केली.

**केदार गोराटे, नीलेश पवार, नीलेश सपकाळ, प्रतीक परब**

श्री. विजय राणे यांच्या मार्गदर्शनाखाली दैनंदिन सराव श्री. **साईनाथ काळसेकर, केदार गोराटे, नीलेश पवार** घेत असतात.

## कला विभाग

सालाबादप्रमाणे ह्या वर्षीसुद्धा मंडळाच्या कलाविभागाने विविध उपक्रम, कार्यक्रम, स्पर्धा ह्यांचे आयोजन यशस्वीपणे केले. दि. १४ एप्रिल ते ३० एप्रिल २०१६ ह्या कालावधीत झालेल्या ''बाल नाट्य प्रशिक्षण'' शिबिराचा समारोप ३० एप्रिल २०१६ रोजी, रविंद्र नाट्य मंदिर येथे पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकॅदमी येथे भव्य प्रमाणात पार पडला. बालनाट्य शिबिरासाठी कलाविभागप्रमुख श्री. दत्ता सावंत, संचालिका श्रीमती लीला हडप व सहसंचालिका श्रीमती सीमा पारकर ह्यांना मंडळाच्या सर्व कलाकारांनी बहुमोल सहकार्य केले. अहवाल वर्षी मंडळात मोठ्या प्रमाणात दुरुस्तीचे काम चालू असल्यामुळे ''नाट्यतंत्र प्रशिक्षण'' कार्यशाळा होऊ शकली नाही. मंडळातर्फे ह्या वर्षी सुद्धा महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा, महाराष्ट्र राज्य बाल नाट्य स्पर्धा, दीर्घांक स्पर्धा, विविध एकांकिका स्पर्धा ह्या मध्ये भाग घेतला होता. सांस्कृतिक अमावस्या, बालनाट्य प्रशिक्षण शिबीर, एकांकिका लेखन स्पर्धा, राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा ह्यांना उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला.

प्रयोग, मालाड ह्या संस्थेतर्फे आयोजित राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत मंडळातर्फे सादर केलेल्या आणि ''**एकदा काय गम्मत झाली**'' ह्या एकांकिकेची अंतिम फेरीसाठी निवड झाली. मंडळाचे सभासद श्री. अमित सोलंकी दिग्दर्शित ह्या एकांकिकेतील कलाकार **तृप्ती जाधव हिने अभिनयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले.**

चेंबूर येथे झालेल्या कै. शांता जोग स्मृत्यर्थ एकांकिका स्पर्धा मंडळातर्फे श्री. दत्ता सावंत लिखित आणि श्री. अमित सोलंकी दिग्दर्शित **''बेगमा''** ही एकांकिका सादर करण्यात आली. **ह्या स्पर्धेत तृप्ती कदम, प्रणाली कदम ह्यांना अभिनयासाठी व श्री. संजय तोडणकर ह्यांना प्रकाश योजनेसाठी पारितोषिके मिळाली.**

संपूर्ण जगाला भेडसावणाऱ्या **''एडस''** ह्या ज्वलंत विषयावर समाज प्रबोधनात्मक नाटक **''चाहुल उद्याची''** राज्य नाट्य स्पर्धेत सादर करण्यात आले. मंडळाचे तहहयात **सभासद श्री. दत्ता सावंत लिखित** आणि दिग्दर्शित **ह्या नाटकातील एक कलाकार कुमारी तृप्ती जाधव** हिला **''झी नाट्य गौरव'' स्पर्धेत अभिनयासाठी ''उत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री'' ह्या पारितोषिकासाठी नामांकन प्राप्त झाले.** मंडळाने या नाटकाचे विविध ठिकाणी सामाजिक जाणीवेतून ७ प्रयोग केले. महाराष्ट्र राज्य बाल नाट्य स्पर्धेत मंडळाने सादर केलेल्या अमित सोलंकी दिग्दर्शित **''बंध नात्याचे''** या बाल नाटयातील कलाकार **कुमार हर्षवर्धन देवरुखकर याला अभिनयाचे पारितोषिक मिळाले.**

ह्या वर्षी मंडळातर्फे प्रथमच **''राज्यस्तरीय नाट्य गीत गायन''** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. राज्याच्या विविध भागातून आलेल्या तरुण कलावंतांनी गाजलेली नाट्यगीते समर्थपणे सादर करुन स्पर्धा अविस्मरणीय केली. ह्या स्पर्धेसाठी संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कलाकार, अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन आणि पहिले विश्व मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष **श्री. रामदास कामत** हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

दरवर्षी प्रमाणे या वर्षी दि. २६ मार्च २०१७ रोजी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेतली त्यात सर्व महाराष्ट्रातून चांगला प्रतिसाद मिळाला.

# आमचे उल्लेखनीय



## मधुरा पेडणेकर – खो खो

विचारे प्रतिष्ठान यांचा खेळाडू गौरव पुरस्कार २०१७

मुंबई शहर महिला व महाराष्ट्र संघात निवड २०१७

पश्चिम विभागीय मुली महाराष्ट्र संघातून निवड २०१७

मुंबई विद्यापीठाच्या संघात निवड

एका वर्षात ज्युनियर व सिनियर नॅशनल खेळलेली मंडळाची पहिली खेळाडू



## अनिकेत देवेंद्र पेवेकर – कबड्डी

मुंबई शहर कुमार संघात निवड

मुंबई शहर संघाचे कर्णाधार पद

महाराष्ट्र कुमार संघात निवड



## तेजश्री सारंग – कबड्डी

मुंबई शहर मुली संघात निवड व मुंबई शहर संघाचे कर्णधार पद

महाराष्ट्र मुली संघात निवड व महाराष्ट्र मुली फेडरेशन संघाचे कर्णधार पद.

संभाव्य भारतीय महिला संघात निवड



## सीमा घोगळे – कलाविभाग

१९९७ साली रंगभूमीवर पाऊल ठेवले. आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत विविध एकांकिका सादर करुन भारतीय विद्या भवन, आय. एन्. टी आणि मृगजळ या तिन्ही स्पर्धांसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा प्रथम पुरस्कार प्राप्त केला आहे. 'गोलपीठा' या राज्य नाट्य स्पर्धेत सादर झालेल्या नाटकासाठी रौप्यपदक प्राप्त केले. अनेक हौशी स्पर्धांमधून भाग घेऊन आजवर २० च्या वर सर्वोत्कृष्ठ अभिनेत्रीसाठी प्रथम क्रमांकाचे पुरस्कार प्राप्त केले. १९९८ साली व्यावसायिक रंगभूमीवर पाऊल ठेवलं आणि 'गोलपीठा' या व्यावसायिक नाटकासाठी नाट्यपर्दापणाचा नवोदित अभिनेत्रीचा पुरस्कार प्राप्त केला.

१९ वर्षांच्या नाट्य प्रवासात १३ व्यावसायिक नाटके (गोलपीठा, जाऊबाई जोरात, पाच पांडवांचा बाप, लाडी लबाडी,कुमारी गंगुबाई मॅट्रिक, म्हातारे जमीन पर, भैय्या हातपाय पसरी, वस्त्रहरण, शेवग्याच्या शेंगा, टू बी कंन्टीन्यूड, रात्रीस खेळ चाले, सुरक्षित अंतर ठेवा) ३ प्रायोगिक नाटके (महाभारत बीटवीन द लाईन्स) २६/५२ उन्हापावसाची बेरीज, वजाबाकी, शिकस्त) २६/५२ साठी झी गौरवाचं सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचं नामांकन प्राप्त केले. सगळ्या नाटकांचे मिळून ४५०० च्या वर नाट्यप्रयोग सादर केले. १० पेक्षा विविध मालिकांमधून काम केले. जोडीदार, ही पोरगी कुणाची, धनगरवाडा, वारसा या चित्रपटातून भूमिका केल्या.

शांता जोग एकांकिका स्पर्धा, ओम साई मित्र मंडळ, एकांकिका स्पर्धा कामगार कल्याण मंडळ आयोजित महिला नाट्य व बालनाट्य स्पर्धा, प्रकाश देसाई (पाली) आयोजित एकांकिका स्पर्धा, एम्. एस्. सी. बी. खात्यांतर्गत नाट्यस्पर्धा, आय. पी. सी. एल. आयोजित (नागोठणे) कोकण करंडक नाट्य स्पर्धा, महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा आदि स्पर्धांना परीक्षक म्हणून काम केले.

नवी मुंबई म्युझिक ॲण्ड ड्रामा सर्कल आयोजित बालनाट्य शिबिर, शिवसेना नगरसेविका मीनल जुवारकर आयोजित बालनाट्य शिबिर आणि अमर हिंद मंडळ आयोजित बालनाट्य शिबिरांसाठी आयोजित करीत आहे.

## समाजकल्याण मदत निधी

- इंडियन असोसिएशन ऑफ हॅडीकॅप फोल्डींग केन रु. २२५०/-, स्वयंम रिहॅबिलेशन ट्रस्ट रु. २५,०००/, सुईत जीवन ट्रस्ट रु. २५,०००/-, जन सहयोग ट्रस्ट रु. ११,०००/-, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे रु. २५,०००/-, गगनाला पंख नवे रु. १०,०००/-

## ज्येष्ठ तहहयात सभासदांचा सत्कार (७५ वर्षावरील)

- अनंत भाताडे रु. २,५००/-, विजयकुमार वरळीकर रु. २,५००/-, रविंद्र अधिकारी रु. २,५००/-, शरद पुरोहित रु. २,५००/-, दिनकर चोडणकर रु. २,५००/-, गजानन सावंत रु. २,५००/-, चंद्रकांत सावंत रु. २,५००/-, सुनिता श्रीधर भोसले रु. २,५००/-, जयवंत अनंत शिरसाट रु. २,५००/-

## शैक्षणिक मदत निधी

- वाचाल तर वाचाल अंतर्गत रु. १,१५,०११/-, वार्षिक परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या मंडळाच्या विदयार्थ्यांचा गुणगौरव रु. २४,५००/-, एस. एस. सी. पास करुन कॉलेज मध्ये जाणाऱ्या २१ विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती रु. ५,०००/- प्रत्येकी प्रमाणे एकंदर खर्च रु. १,०५,०००/-, मंडळाच्या विद्यार्थ्यांना एम आय सी आय टी रु. ३४,३५०/- एकूण खर्च रु. २,७८,८६१/-

## सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय आणि सांस्कृतिक कार्य करणाऱ्या समाजसेवी संस्थांना विनामूल्य/सवलतीच्या दरात सभागृह

- 'संवाद' जेष्ठ नागरिक संघ ● मी दादरकर (समाधान सरवणकर) ● डॉ. आलेखा चोरघे - व्यासपीठ ● श्रीमती शिवानी जोशी - पुस्तक प्रकाशन ● संदीप देशपांडे ● सी. के. पी. महिला मंडळ, दादर ● अजित कदम (शिवसेना) ● आदित्य गंधेकर (मनसे) ● सी. के. पी. एज्युकेशन सोसायटी, दादर, ● मावा, छाया दातार पुस्तक प्रकाशन ● यु. बी. आय. रिटायरी वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र. ● श्रीमती जोशी - व्यास क्रीडा संघातर्फे 'मी अत्रे बोलतोय' पुस्तकाचे प्रकाशन, दैवज्ञ हितवर्धक समाज, दादर ● नाबर गुरुजी विद्यालय, महात्मा फुले कन्या शाळा ● मुंबई मराठी पत्रकार संघटना ● इंडियन बँक एम्लॉईज युनियन.

## -: समारोप :-

मंडळाने गेल्या वर्षभरात अनेक नवीन गोष्टींची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला. मंडळाचा कारभार समर्थपणे पेलण्यासाठी भावी पिढी तयार करण्याच्या उपक्रमात अनेकांनी सहभाग नोंदवला. संघ बांधणी अधिक सक्षमपणे व्हावी यासाठी प्रयत्न सुरु आहेत. मंडळाच्या कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धा यांच्या आयोजनासाठी तसेच निधींचा योग्य विनियोग करण्यासाठी जास्तीत जास्त तहहयात सभासद, खेळाडू, कलाकार यांना मंडळाच्या कार्यात सामावून घेतले आहे. मंडळाचे क्रीडाविभाग, कलाविभाग, आपापल्या कीर्तीला साजेसे कार्य करीत आहेत. मंडळाच्या क्रीडा विभागाच्या कबड्डी, खोखो व लंगडी या संघाने

यावर्षी बऱ्याच ठिकाणी मान्यवर स्पर्धेमध्ये भाग घेऊन आपले नैप्पुण्य बऱ्याच ठिकाणी अजिंक्यपद मिळवून दाखविले आहे. कला विभागाने एकांकिका स्पर्धा, राज्य नाट्य स्पर्धा यामध्ये विविध स्पर्धेमध्ये भाग घेऊन आपली कला दाखविली आहे. संजय पेडणेकर, विजय राणे, प्रफुल्ल पाटील, विलास कारेकर, दत्ता सावंत, रविंद्र ढवळे, सीमा कोल्हटकर, जतिन टाकळे, रोहन चव्हाण, अमित चिखलकर, अमित संत, साईनाथ काळसेकर, लीला हडप, हेमा घरत, अनंत घोगळे, सीमा घोगळे, चंदन जमदाडे, अमित सोलंकी, भूषण गमरे, रमेश नाटेकर,वर्षा राजे, रमेश तांबे, नेहा खरे, इत्यादींच्या उल्लेखनीय सहकार्याबद्दल आभार व्यक्त करीत आहोत.

मंडळाचे लेखापाल श्री. गणेश मोंडकर व व्यवस्थापक सुधीर कुळकर्णी, कर्मचारी संदीप चांदे, रविंद्र भुवड यांचे दैनंदिन कामकाजात तसेच वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रम, उपक्रमांत योग्य सहकार्य मिळत आहे.

मयुर कॅटरर्सचे अविनाश पाटील, मयुर पाटील यांचे वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमांत व उपक्रमांत मिळणाऱ्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करीत आहोत.

अमर हिंद मंडळाचा कार्यभार सांभाळण्यासाठी तसेच कार्यक्रमांचे आयोजन नीटपणे करण्यासाठी सर्व पदाधिकारी, सदस्य, खेळाडू, कलाकार, कार्यकर्ते येत असतात त्यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना आनंद होत आहे. पत्रकार, वृत्तपत्र, संपादक, बँकर्स यांचे मनपूर्वक आभार.

## श्रद्धांजली

मंडळाचे तहहयात सभासद, राष्ट्रीय खो खो खेळाडू आणि मुंबईची कर्णधार मालती पाटील – देशमुख हिचे अहवाल काळात अकाली निधन झाले. तसेच अहवाल काळात दिवंगत झालेल्या ज्ञात–अज्ञात सभासद, हितचिंतक, कार्यकर्ते यांना अमर हिंद मंडळाची भावपूर्ण श्रद्धांजली.

अहवाल कालावधीत आयोजित केलेल्या कार्यक्रमांत सहभागी होऊन सभासदांनी केलेले सहकार्य, तसेच कार्यकर्ते, हितचिंतक, कलाकार, खेळाडू व मंडळाचे कर्मचारी यांनी केलेले सहकार्य याचा पुन्हा एकदा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून आणि पुढील वाटचालीत या सर्वांचे सहकार्य मिळेल अशी सदिच्छा व्यक्त करून हा अहवाल समाप्त करीत आहे.

कळावे लोभ असावा आणि तो वृद्धिंगत व्हावा ही विनंती.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने
**श्रीकृष्ण राणे**
कार्यवाह

# (परिशिष्ट 'अ')

## दि. १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७

## संयुक्त व कार्यकारी समिती सभा उपस्थितीची माहिती

| अ. क्र. | नाव | हुद्दा | संयुक्त सभा (३) | कार्यकारी समिती सभा (११) |
|---|---|---|---|---|
| १) | दिनकर पाटील | विश्वस्त | २ | -- |
| २) | उषा मेहता | विश्वस्त | ३ | -- |
| ३) | रमेश वरळीकर | विश्वस्त | २ | -- |
| ४) | भास्कर सावंत | अध्यक्ष | ३ | -- |
| ५) | चिंतामणी नागले | उपाध्यक्ष | ३ | -- |
| ६) | उर्मिला शेणॉय | उपाध्यक्ष | ३ | -- |
| ७) | दीपक पडते | कार्याध्यक्ष | ३ | ११ |
| ८) | अरुण देशपांडे | कार्योपाध्यक्ष | ३ | १० |
| ९) | श्रीकृष्ण राणे | कार्यवाह | ३ | ११ |
| १०) | प्रफुल्ल पाटील | संयुक्त कार्यवाह | ३ | १० |
| ११) | सतीश रेडीज | कोषाध्यक्ष | ३ | ११ |
| १२) | दत्ता सावंत | सदस्य | २ | ११ |
| १३) | सीमा कोल्हटकर | सदस्य | ३ | १० |
| १४) | संजय पेडणेकर | सदस्य | ३ | ०९ |
| १५) | विजय राणे | सदस्य | ३ | ११ |
| १६) | दीपक नाडकर्णी | सदस्य | ३ | ०७ |
| १७) | विलास कारेकर | सदस्य | २ | ०९ |
| १८) | रविंद्र ढवळे | स्वीकृत सदस्य | ३ | १० |
| १९) | रमेश नाटेकर | स्वीकृत सदस्य | ३ | ११ |
| २०) | जतीन टाकळे | स्वीकृत सदस्य | ३ | ०९ |
| २१) | वर्षा राजे | स्वीकृत सदस्य | ३ | ०६ |

## अमर हिंद मंडळाची आंतर शालेय क्रिडा स्पर्धांची (खोखो, कबड्डी व लंगडी) क्षणचित्रे



















## राज्यस्तरीय नाट्यगीत गायन स्पर्धेची क्षणचित्रे























# राज्यस्तरीय नाट्यगीत गायन स्पर्धेची क्षणचित्रे



















## कै. वसंत भालेकर स्मृती प्रित्यर्थ आयोजित क्रिडापत्रकार परिषद

















## ६९ वी वसंत व्याख्यानमाल


















## ६९ वी वसंत व्याख्यानमाल





